पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम

● वर्ष १ ● अंक १०६ ● बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 /A4530 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com


**सुविचार**

"विश्वास हा खोडरबरसारखा असतो, तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो."






## »थोडक्यात

### इंजिनिअर हतबल, तंत्रज्ञानही अपयशी!

**उज्जैन :** २०२८ च्या सिंहस्थ महाकुंभाच्या तयारीनिमित्त, उज्जैनमधील कंठाल चौक ते छत्री चौक या मार्गाचे रुंदीकरण केले जात आहे. याच मदनलाल शर्मा मार्गावरील सती गेटजवळ (नई पैठ आणि छत्री चौकाजवळ) हनुमानाची उभी मूर्ती असलेले एक मंदिर आहे. हे मंदिर १७० वर्षे जुने, म्हणजेच १८५७ च्या काळातील असल्याचे मानले जाते. रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी हे मंदिर अन्यत्र हलवण्याची योजना महानगरपालिकेने आखली होती. ४ आणि ५ सप्टेंबर रोजी महानगरपालिकेच्या पथकाने मंदिराची वास्तू पाडण्यास सुरुवात केली. त्यानंतर भगवान हनुमानाची मूर्ती हलवण्याची वेळ आली. प्रशासनाने प्रयत्न केले, परंतु हनुमानाची उभी मूर्ती इंचभरही हलली नाही. चार दिवसांत मूर्ती हलवण्याचे चारही प्रयत्न अयशस्वी ठरले.

-----------------------------------

### उपमुख्यमंत्री शिंदेंना लंडनच्या सायबर हल्ल्याचा फटका!

**लंडन :** लंडनच्या हिथ्रो एयरपोर्टवर सायबर हल्ला झाल्याच्या संशयातून जवळपास सर्व विमानांची उड्डाणे १० ते १२ तास उशिराने होत असल्याची माहिती आहे. तर तब्बल १२०० फ्लाईट्सला डायव्हर्ट करण्यात आले आहे.

अशातच या विमानांच्या उड्डाणाचा फटका महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ओएसडी आणि फोटोग्राफर यांना बसल्याची माहिती आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उल्लेखनीय कार्याची आणि लोककल्याणकारी योजनांची दखल आता आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. ब्रिटनच्या संसदेत ९ आणि १० सप्टेंबर रोजी दोन महत्वपूर्ण आणि स्वतंत्र कार्यक्रम होणार असून त्याचे विशेष निमंत्रण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवण्यात आले आहे.


**CLASSIFIED**

**सिक्युरिटी गार्ड पाहिजे**

6 पदे अंजनगाव सुर्जी करिता

आठ तास ड्युटी

3 पदे ड्रायव्हर पाहिजे

संपर्क

**डेल्टा**

सिक्युरिटी सर्विस अमरावती.

9370030081,8421846450


# पीक सर्वेक्षण त्वरित करा!

## मुख्यमंत्री फडणवीस: विदर्भात पावसाची 35 टक्क्यांवर तूट

प्रतिनिधी ९ सप्टेंबर





**मुंबई :** राज्यातील काही भागांत पावसाने दीर्घ काळ खंड दिल्याने पिके धोक्यात आली आहेत. विदर्भात पावसाची तूट ३५ टक्क्यांवर गेली असून, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांतही पावसाचे प्रमाण कमी आहे. या पार्श्वभूमीवर पावसाची मोठी तूट असलेल्या भागांत पिकांचे तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करण्याचा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिला आहे.'पिके वाचविण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी सिंचनाची व्यवस्था करण्याबरोबरच नुकसान झालेल्या पिकांना पंचनाम्याच्या आधारे मदत देण्याची कार्यवाही करावी,' अशी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीनंतर माध्यमांना याबाबत माहिती दिली. 'पावसाने खंड दिल्यामुळे अनेक भागांत जमिनीतील ओलावा कमी झाला असून, उभ्या पिकांना पाण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे पावसाची मोठी तूट असलेल्या भागांची स्वतंत्र पाहणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्वेक्षणातून पिकांची नेमकी स्थिती स्पष्ट झाल्यानंतर नुकसान झालेल्या भागात मदतीची कार्यवाही केली जाणार आहे,' असे त्यांनी सांगितले.

### दररोज १२ तास वीज

पिकांना पाणी देता यावे, यासाठी दररोज १२ तास वीजसेवा देण्याचा आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. वीजपुरवठ्यात अडथळा ठरणारे जळालेले रोहित्र तातडीने बदलून शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा करण्यास सांगण्यात आले आहे. 'पावसाअभावी पिके वाचविणे शक्य असलेल्या भागांत सिंचनाचे नियोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. मात्र, पिकांचे नुकसान झाले असल्यास सर्वेक्षण आणि पंचनाम्यांच्या आधारे नुकसानभरपाईची कार्यवाही केली जाईल,' असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करा!

पावसाच्या तुटीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करण्याचा आदेशही दिला आहे. जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील जलसाठ्यांमध्ये किती पाणी आहे आणि त्याचा पुढील वर्षभरात कोणत्या पद्धतीने वापर करता येईल, याचे नियोजन करण्यास मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. पाऊस पुन्हा सुरू होऊन तूट भरून निघाल्यास परिस्थिती सुधारू शकते. मात्र, पावसाची स्थिती प्रतिकूल राहिल्यास उपलब्ध पाणी, सिंचन आणि पीकनुकसान यांचा आढावा घेऊन पुढील उपाययोजना करण्याचे संकेत सरकारने दिले आहेत.

# राज्य सरकारला जरांगे पाटलांना मारायचंय!

## खासदार संजय राऊतांचा आरोप

प्रतिनिधी ९ सप्टेंबर



**मुंबई :** राज्य सरकारला मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांना मारायचे आहे. मनोज जरांगे हे सरकारच्या गळ्यातील फास झाले आहेत, असे वक्तव्य ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले.

मनोज जरांगे पाटलांची लढाई आणि त्यांचा संघर्ष हा सत्ताधाऱ्यांच्या गळ्यातील फास बनला आहे. मनोज जरांगे पाटील यांचा उपयोग सरकारसाठीचा संपला आहे. सरकारने त्यांच्या उपोषणाचा आणि लढ्याचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करुन घेतला आणि आता जरांगेंना वाऱ्यावर सोडले आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज १२ वा दिवस आहे. या काळात त्यांची प्रकृती प्रचंड खालावली आहे. हे अत्यंत अमानुष आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले. ते बुधवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. एकीकडे मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळेपर्यंत उपोषण करण्यावर ठाम असले तरी राज्य सरकार हे आता जरांगेंची फार समजूत काढण्याच्या फंदात पडेल, असे दिसत नाही. मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी तसे स्पष्ट संकेत दिले होते. मनोज जरांगे आंदोलनावर ठाम असतील तर तो त्यांचा निर्णय आहे. शासनाकडून जे जे निर्णय करणे आवश्यक होते ते आपण केलेले आहेत. त्यात त्यांचे समाधान होत नाही. आपण प्रयत्न करत आहोत पण त्याच्या पलीकडे जाऊन त्यांच्या मनात काही अजूनही प्रश्न असतील तर ते आपण सोडवतच आहोत. शेवटी मराठा समाजाच्या व्यापक हिताकरता आपण निर्णय करत आहोत. त्या निर्णयाची अंमलबजावणी सुद्धा सुरू आहे. त्यात जरांगे पाटील समाधानी नाहीत. त्याच्यामुळे आता माझ्याकडे असा काही पर्याय नाही, ज्यामुळे मी त्यांचे समाधान करू शकेल, असे राधाकृष्ण विखे-पाटील यांनी म्हटले होते.

# महापालिकेत भाजपला मोठा राजकीय धक्का!

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला:** अकोला महानगरपालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला एक मोठा राजकीय धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रभाग क्रमांक ४ च्या भाजप नगरसेविका पल्लवी मोरे या आपल्या नगरसेवक पदाचा राजीनामा देण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आधीच संख्याबळावर तारेवरची कसरत करत असलेल्या भाजपला मोठा धक्का मानला जात आहे. शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पल्लवी मोरे यांची अकोला जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून निवड झाली आहे. सरकारी सेवेत रुजू होण्यासाठी त्यांना लोकप्रतिनिधी पदाचा त्याग करावा लागणार असून, त्या लवकरच महापालिका आयुक्तांकडे आपला राजीनामा सोपवणार असल्याचे समजते. त्यांचा हा निर्णय योग्य असल्याची चर्चा रंगली आहे. पण,पक्षाला याचा मोठा फटका बसणार आहे. नगरसेविका ते जिल्हा परिषद शिक्षिका असा प्रवास करणाऱ्या पल्लवी मोरे यांच्या या निर्णयामुळे अकोला महापालिकेच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

### प्रभाग ४ मध्ये पोटनिवडणुकीचे वारे

नगरसेविका पल्लवी मोरे यांच्या राजीनाम्यामुळे प्रभाग क्रमांक ४ मधील एक जागा रिक्त होणार असून, तेथे पोटनिवडणूक लागणे अटळ मानले जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रभागातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, सत्ताधारी भाजपसह विरोधी पक्षांनीही मोर्चेबांधणी सुरू केली आहे. दरम्यान, आगामी पोटनिवडणुकीसाठी भाजप कोणाला उमेदवारी देणार याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रभाग क्रमांक ३ मधून एका माजी युवा नगरसेवकाच्या पत्नीचे नाव आघाडीवर असून, त्यांच्या नावाची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

# विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसेन यांचे पद धोक्यात!

## काँग्रेसच्या 13 नगरसेवकांची स्वाक्षरी ?

प्रतिनिधी ९ सप्टेंबर



**अकोला :** अकोला महापालिकेच्या राजकारणात एक मोठी बातमी समोर येत असून सत्ताधाऱ्यांना घेरण्याऐवजी प्रमुख विरोधी पक्ष असलेला काँग्रेस स्वतःच अंतर्गत वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. महापालिकेचे विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसेन यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत पक्षांतर्गत बंडखोरी उफाळून आली आहे. डॉ. जिशान हुसेन यांचे विरोधी पक्षनेतेपद हटवण्यासाठी पक्षाच्याच नगरसेवकांनी थेट आघाडी उघडल्याने अकोल्याच्या राजकीय वर्तुळात तीव्र खळबळ उडाली आहे. अकोला महापालिकेत काँग्रेसचे एकूण २१ नगरसेवक आहेत. यापैकी १३ हून अधिक नगरसेवकांनी एकत्र येत विरोधी पक्षनेता बदलण्याच्या मागणीसाठी एका स्वाक्षरी मोहिमेवर सह्या केल्याची पक्की माहिती समोर आली आहे. पक्षातील बहुसंख्य नगरसेवकच विरोधी पक्षनेत्याच्या विरोधात उभे राहिल्याने डॉ. जिशान हुसेन यांचे पद जाणे आता जवळपास निश्चित मानले जात आहे. सत्ता पक्षाच्या विरोधात वारंवार आवाज उठविणाऱ्या डॉ.जिशान हुसेन हे नेमके कोणाला अडसर ठरत आहे, असा प्रश्न विचारला जात आहे. कचरा कंत्राटाच्या विरोधात त्यांची न्यायालयीन लढाई यामुळे तर त्यांचे विरोधी पक्षनेते पद धोक्यात आले तर नाही ना अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# तडीपार संपादकावर खंडणी आणि बदनामीचा गुन्हा दाखल!

## मोरगाव भाकरे ग्रामपंचायत प्रशासकाची पोलिसांत तक्रार

प्रतिनिधी ९ सप्टेंबर



**बाळापूर :** ग्रामपंचायतीची बदनामी थांबवण्यासाठी आणि खोट्या बातम्या न छापण्यासाठी २५ हजार रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी दैनिक 'वचक लोकशाहीचा'चे संपादक आणि वार्ताहारावर उरळ पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे येथील गटग्रामपंचायतीच्या प्रशासक तथा माजी सरपंच उमाताई ज्ञानेश्वर माळी यांनी यासंदर्भात तक्रार नोंदवली आहे. मार्च २०२६ पासून दैनिक 'वचक लोकशाहीचा'चे संपादक रवीराज मोरे आणि वार्ताहार आकाश कोकाटे यांनी ग्रामपंचायतीत कथित गैरव्यवहार झाल्याच्या पुरावा नसलेल्या आणि बदनामीकारक बातम्या वारंवार प्रसिद्ध केल्या. दरम्यान सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार वचक लोकशाहीचा संपादक रवीराज मोरे यांच्या विरोधात यापुर्वी सहा गुन्हे दाखल असून त्याला अकोला,वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी (१३ ऑगस्ट २०२६ पासून ते १३ फेब्रुवारी २०२७) तडीपार केले आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, आरोपींनी ग्रामपंचायतीच्या तात्कालीन सचिव विद्या वाघ यांना अवेळी फोन करून अवाजवी आरोप केले व विकासकामांवरून दमदाटी केली. याशिवाय गावातील आरओ वॉटर प्लांटचा ताबा सोडण्यास नकार देणाऱ्या जुन्या चालकाच्या सांगण्यावरूनही आरोपींनी खोट्या बातम्या छापल्या. बातमीचा आधार घेऊन आरोपींनी ओळखीच्या व्यक्तींमार्फत आणि कर्मचाऱ्यांना फोन करून 'नावासह व फोटोसह बदनामीकारक बातमी छापू' अशी धमकी दिली. जुलै २०२६ मध्ये उमाताई माळी यांनी वार्ताहार आकाश कोकाटे याला खोट्या बातम्या न छापण्याची विनंती केली असता, त्याने ग्रामपंचायतीच्या हिशोबानुसार २५,००० रुपये खंडणीची थेट मागणी केली. तसेच इन्स्टाग्राम व इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरही दिशाभूल करणाऱ्या बातम्या शेअर करून बदनामी सत्र सुरूच ठेवले. सततच्या त्रासाला कंटाळून अखेर उमाताई माळी यांनी उरळ पोलीस ठाणे गाठून लेखी तक्रार दाखल केली. पोलिसांनी विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर केंद्र यांच्याकडे सोपवला आहे.

# शाडू माती गणेश मूर्ती कार्यशाळेचे मनपाकडून आयोजन

## कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद : अनिल बिडवे





प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला:** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने अकोला महानगरपालिकेच्या पर्यावरण संवर्धन व उद्यान विभागाद्वारे आज, बुधवार सकाळी १०वाजता शहरभरात विशेष जनजागृती कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

मात्र, मनपा प्रशासनाकडून महापालिका शाळांना या उपक्रमातून वगळण्यात आल्याची तसेच नियोजन योग्य प्रकारे न झाल्याने अनेक ठिकाणी विद्यार्थी व नागरिकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याची कबुली संबंधित मनपा अधिकाऱ्यांनी दिली आहे. या कार्यशाळेत शालेय विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने शाडू मातीपासून गणपती मूर्ती बनवणे तसेच गणेशोत्सवादरम्यान तयार होणाऱ्या निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यापासून खत निर्मिती कशी करावी, याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन देण्यात आले. महापालिका नगर सचिव अनिल बिडवे यांनी कार्यशाळेला अल्प प्रतिसाद मिळाल्याचे मान्य केले. महापालिका कार्यशाळेपुर्वीच खाजगी संस्थेच्या कार्यशाळेला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे ते म्हणाले. खाजगी शाळेच्या विद्यार्थ्यांना सोबत घेत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तर महापालिकेच्या अनेक शाळांना या कार्यशाळेसाठी निमंत्रण देखील नव्हते. त्यामुळे महापालिकेच्या काही शाळांचा सहभाग नसल्याची माहिती मिळाली.

### जरांगेंच्या प्रश्नांवर आज तातडीची बैठक!

**छ. संभाजीनगर :** मनोज जरांगे पाटील हे गेल्या १२ दिवसापासून उपोषणाला बसले आहेत. जरांगेंनी अन्नपाणी सोडल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यांनी उपचार घेण्यास सुरुवात केली असली तरी त्यांच्या प्रकृतीत म्हणावा तसा फरक पडलेला नाही. त्यातच मराठा समाज अधिक आक्रमक झाला असून राज्यात अनेक ठिकाणी रास्ता रोको आणि बंद पुकारला जात आहे. त्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारवरही दबाव वाढला आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने बुधवारी छत्रपती संभाजीनगरात तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत जरांगे यांच्या प्रश्नावर निर्णायक तोडगा काढला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाजी नगरात मोठ्या घडामोडी घडणार असून याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे.




# नाभिक समाजाचे आराध्य संत सेना महाराज यांची पुण्यतिथी

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत सावता माळी आणि संत गोरा कुंभार वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कर्मयोगी गाडगे महाराज यांच्याप्रमाणेच संत शिरोमणी संत सेना महाराज यांनी आपल्या आचरणातून भक्ती, सेवा, श्रमप्रतिष्ठा, समता आणि मानवतेचा महान संदेश समाजाला दिला. त्यांचे जीवन म्हणजे केवळ एका संताचे चरित्र नाही, तर सामान्य माणसाच्या कष्टाला प्रतिष्ठा देणारा आणि माणुसकीला धर्माच्या केंद्रस्थानी ठेवणारा विचार आहे. आज संत सेना महाराजांची पुण्यतिथी साजरी करताना केवळ त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून किंवा जयघोष करून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचा अर्थ समजून घेणे, तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि आपल्या आचरणातून तो समाजासमोर ठेवणे हीच त्यांच्या चरणी खरी आदरांजली ठरेल.

संत सेना महाराजांचा जन्म नाभिक समाजात झाला. त्या काळातील सामाजिक परिस्थितीत व्यवसायावरून माणसाची प्रतिष्ठा ठरवली जात होती. मात्र सेना महाराजांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाकडे कमीपणाच्या नजरेने पाहिले नाही. त्यांनी आपल्या श्रमाला ईश्वरसेवेचे स्वरूप दिले. केस कापणे, दाढी करणे यांसारखा समाजाच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेला व्यवसाय त्यांनी प्रामाणिकपणे केला. यामधून त्यांनी एक अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला—काम कोणते आहे यापेक्षा ते किती प्रामाणिकपणे केले जाते, हे अधिक महत्त्वाचे आहे.

संत सेना महाराजांची भक्ती ही केवळ कर्मकांडापुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या जीवनात काम, नामस्मरण आणि सेवा यांचा सुंदर संगम दिसतो. विठ्ठलभक्ती त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होती. मात्र त्यांची भक्ती समाजापासून दूर नेणारी नव्हती; उलट ती त्यांना समाजाच्या अधिक जवळ घेऊन जाणारी होती. गरजूंची सेवा करणे, आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहणे आणि परमेश्वराचे स्मरण करणे—यातूनच त्यांनी भक्तीचा खरा अर्थ समाजाला समजावून सांगितला. संत सेना महाराजांच्या जीवनाशी जोडलेली विठ्ठलभक्तीची परंपरागत कथा आजही भक्तांच्या मनात श्रद्धा निर्माण करते. त्यांच्या निष्कपट भक्तीमुळे विठ्ठलाने त्यांच्या भक्ताची लाज राखली, असा वारकरी परंपरेतील भावार्थ आहे. या कथेतून एक मोठा आध्यात्मिक संदेश मिळतो—देव भक्ताच्या भावनेला पाहतो; बाह्य दिखावा, अहंकार किंवा संपत्तीला नव्हे.

संत सेना महाराजांचे जीवन आपल्याला सांगते की, भक्ती ही केवळ देवापुढे हात जोडण्यात नाही; तर माणसाच्या दुःखात त्याच्या पाठीशी उभे राहण्यात आहे. भुकेल्याला अन्न, गरजूला मदत, दुःखी व्यक्तीला आधार, कष्टकरी माणसाला सन्मान आणि प्रत्येक व्यक्तीशी माणुसकीने वागणे—हीच खरी समाजसेवा आणि हीच खरी भक्ती.



माणूस जोडणे, मने जोडणे आणि समाज जोडणे—हीच संतविचारांची खरी दिशा आहे. आज नाभिक समाजाने त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेताना शिक्षण, उद्योग, आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्यविकास, सामाजिक एकजूट आणि समाजसेवा या क्षेत्रांत पुढे जाण्याची गरज आहे. आपल्या पारंपरिक व्यवसायाचे आधुनिकीकरण करताना त्यातील सेवा, कौशल्य आणि प्रामाणिकपणा जपणे हीसुद्धा संत सेना महाराजांना खरी आदरांजली ठरेल. आजचा तरुण माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहे. हातात मोबाईल आहे, जगाशी जोडण्याची साधने आहेत; पण अनेकदा जीवनमूल्यांपासून दुरावण्याची भीतीही आहे. अशा वेळी संत सेना महाराजांचे जीवन तरुणांना सांगते—

कष्ट करा, प्रामाणिकपणे काम करा, आपल्या व्यवसायाचा अभिमान बाळगा, आई-वडिलांचा सन्मान करा, समाजासाठी वेळ द्या आणि जीवनात माणुसकी जपा. यश मिळवणे महत्त्वाचे आहे; परंतु यश मिळवताना माणूसपण हरवू नये, हे त्याहून महत्त्वाचे आहे. आज समाजाला केवळ सुशिक्षित तरुणांची गरज नाही, तर सुजाण, संवेदनशील आणि जबाबदार नागरिकांची गरज आहे. संत सेना महाराजांच्या विचारातून हीच मूल्यशिक्षणाची दिशा आपल्याला मिळते. आपण संत सेना महाराजांच्या विचारांनुसार जगतो आहोत का?, कष्ट करणाऱ्या माणसाचा सन्मान करतो का? समाजातील गरजू व्यक्तीच्या मदतीला धावून जातो का?

आपल्या मुलांना शिक्षणासोबत संस्कार देतो का?

समाजातील भेदभाव कमी करण्यासाठी आपण प्रयत्न करतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधणे म्हणजेच संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीचे खरे औचित्य होय.

### समाजाने संघटित होण्याची गरज

आजच्या काळात कोणत्याही समाजाची प्रगती केवळ भावनिक एकतेने होत नाही. शिक्षण, संघटन, कौशल्य, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकी या पाचही गोष्टी आवश्यक आहेत. संत सेना महाराजांच्या जीवनातील सर्वात मोठा संदेश म्हणजे श्रमाची प्रतिष्ठा. आज आपण कोणतेही काम करण्यापूर्वी त्यातून किती पैसा मिळेल याचा विचार करतो; परंतु संत सेना महाराजांनी आपल्या कामातून किती माणसांची सेवा करता येईल, याला महत्त्व दिले.

संत सेना महाराजांचा काळ वेगळा होता, समाजरचना वेगळी होती आणि जीवनपद्धतीही वेगळी होती. पण त्यांच्या विचारांची उपयुक्तता आजही कमी झालेली नाही. उलट, सामाजिक तणाव, वाढती स्पर्धा, स्वार्थ, भेदभाव आणि मानसिक अस्वस्थता यांच्या काळात संतांचा मानवतावादी विचार अधिकच आवश्यक झाला आहे. त्यांच्या जीवनातून आपण तीन मूलभूत मूल्ये स्वीकारू शकतो—

भक्तीतून श्रद्धा, श्रमातून स्वाभिमान,
आणि सेवेतून माणुसकी.

ही तीन मूल्ये आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात रुजली तर समाज अधिक संवेदनशील, समताधिष्ठित आणि सशक्त होईल. त्यांचे जीवन आपल्याला सांगते की, माणूस जन्माने मोठा होत नाही; तो आपल्या कर्माने मोठा होतो. व्यवसाय लहान-मोठा नसतो; कामातील प्रामाणिकपणा त्याला मोठेपणा देतो. भक्ती केवळ देवाच्या चरणी नसते; ती माणसाच्या सेवेतही असते.

आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन न करता एक संकल्प करूया—

श्रमाचा सन्मान करूया, भेदभावाला नकार देऊया,
शिक्षणाला प्राधान्य देऊया, समाजात एकोपा वाढवूया,
गरजूंच्या मदतीला धावून जाऊया,
आणि संत सेना महाराजांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवूया.

हीच संत सेना महाराजांच्या चरणी खरी आदरांजली ठरेल. "संत सेना महाराजांचा जयघोष केवळ ओठांवर नको; त्यांचे विचार आपल्या आचरणात उतरले पाहिजेत. भक्ती हृदयात, श्रम हातात आणि माणुसकी आपल्या कृतीत असेल, तरच संतविचारांची खरी ज्योत अखंड तेवत राहील." संत शिरोमणी संत सेना महाराज यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन!

**जय संत सेना महाराज!**
**जय विठ्ठल!**
**जय संत परंपरा!**

निवृत्ती राजुरकर (तायडे)
हिवरखेड
मो. 7709517019

# भारतीय दूध क्रांतीचे जनक : डॉ. वर्गीज कुरियन

## डॉ. वर्गीज कुरियन यांचा आज स्मृतिदिन

डॉ. वर्गीज कुरियन हे भारतीय अभियंते तथा उद्योजक होते. भारतीय दुग्ध क्रांतीचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुरियन यांची अमूल या दुग्धप्रक्रिया उद्योगाच्या घडणीत मोठा वाटा होता. मॅगसेसे पुरस्कार (इ.स. १९६३), पद्मश्री (इ.स. १९६५), पद्मभूषण (इ.स. १९६६), पद्मविभूषण (इ.स. १९९९) तसेच जीवनगौरव इत्यादी पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. त्यांचे काका जॉन मथाई भारताचे पहिले रेल्वे मंत्री होते. वर्गीज कुरियन यांचा जन्म ब्रिटिश भारतातील (वर्तमान भारताच्या केरळ राज्यातील) कोळ्हिकोड गावातल्या सीरियन ख्रिस्ती कुटुंबात २६ नोव्हेंबर १९२१ रोजी झाला.



वर्गीज कुरियन इ.स. १९४० साली मद्रास येथील लायोला कॉलेज येथून पदवीधर झाले. त्यानंतर त्यांनी मद्रास विद्यापीठातून बी.ई. (यंत्र अभियांत्रिकी) ही पदवी मिळवली. त्यापुढे वर्गीज कुरियन यांनी टाटा स्टील टेक्निकल इन्स्टिट्यूट, जमशेदपूर येथूनही पदवी प्राप्त केली. उच्च शिक्षणासाठी वर्गीज कुरियन सरकारी शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठात दाखल झाले. तेथे ते विशेष गुणवत्ता श्रेणीत उत्तीर्ण होत एम.एस्?सी. (यंत्र अभियांत्रिकी) झाले.

भारतात परतल्यावर कुरियन यांची नेमणूक सरकारी डेरी मध्ये आणंद, गुजरात येथे झाली. त्या सुमारासच 'खेडा डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह मिल्क प्रोड्यूसर्स युनियन लिमिटेड' डटीप ़१ ही संस्था बाल्यावस्थेत होती आणि तेव्हाच्या बाजारपेठेत मक्तेदारी असलेल्या पोलसन कंपनी विरुद्ध आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करीत होती. त्यावेळी पोलसनने स्थानिक दूध विक्रेत्यांना कमी भाव देणे, मालाचा दर्जा कमी असल्याबाबत कायम तक्रार करणे, जमा केलेले दूध मुंबई सारख्या दूरच्या ठिकाणी विकणे, स्थानिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे, असे प्रकार करीत होती. बाजारपेठेत आपला वेगळा ठसा उमटविल्याने स्थानिकांची नाराजी व रोष पोलसनला जड जात होता. या कंपनी विरुद्ध चांगले काम करणे, स्थानिकांच्या रोजगाराच्या समस्या, योग्य भाव आणि बाजारपेठ अशा समस्या घेऊन के.डी.सी.एम.पी.यू.एल. ही नवी संस्था उभी राहण्याचा प्रयत्न करीत होती. के.डी.सी.एम. पी.यू.एल.चे तेव्हाचे अध्यक्ष त्रिभुवनदास पटेल, वल्लभभाई पटेल आणि मोरारजी देसाई होते. त्यांनी नव्या जोमाने काम सुरू करण्याचे ठरविले.

वर्गीज कुरियन यांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन के.डी.सी.एम.पी.यू. एल.मध्ये काम करण्याचे ठरविले. 'गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड' डटीप ़२ या पालक संस्थेने १४ डिसेंबर, इ.स. १९४६ रोजी के.डी.सी.एम.पी.यू.एल.चे नाव बदलून 'आणंद मिल्क युनियन लिमिटेड' डटीप ़३ असे नाव ठेवले. नव्या जोषात नव्या संस्थेचे काम सुरू झाले. त्यांनी स्थानिकांना रास्त भाव देत, गावोगावी फिरून लोकांना संस्थेत भागीदारी देऊ केली. त्यामुळे लोकांना दुधाच्या दर्जाप्रमाणे भाव तर मिळू लागलाच पण संस्थेच्या कामात प्रत्यक्ष सहभागी होता आले. आता सर्वसामान्य विशेषतः महिला वर्ग 'आपली डेरी' म्हणून अमूलकडे पाहू लागले. संस्थेचे लोकसहभागातून व्यवस्थापन डटीप ़४ ही गोष्ट तेव्हा पूर्णपणे नवी होती. वर्गीज कुरियन यांनी गावोगावच्या लोकांना गोळा करत अमूलचे काम उभे केले. देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. तसेच आपणही कोणापेक्षा कमी नाही असा आत्मविश्वास लोकांमध्ये वाढू लागला.

### रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्रतिष्ठान

कुरियन एकतर अनेक सार्वजनिक संस्थांचे प्रमुख किंवा सदस्य होते. तसेच त्यांनी जगभरातील विद्यापीठांकडून मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त केली होती. प्रख्यात वक्ता यांची व्याख्याने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'डेरी क्षेत्रातील धडे' त्यांच्या कार्याद्वारे 'डाळीसाठी अमूल मॉडेल', ग्रामीण भारतातील सामाजिक व्यवस्थापन धोरणे पार पाडण्यासाठी चालू असलेल्या ग्रामीण समस्यांना लागू करण्यासाठी आयोजित केली जातात. संस्था, किंवा 'न्यायासह वाढ' साठी निधी उभारण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी त्याच्या कार्याचा वापर करणे. कुरियन यांना रेड अँड व्हाईट लाइफटाइम अचिव्हमेंट्स नॅशनल अवॉर्ड देखील प्रदान करण्यात आले.

तेव्हाची सगळ्यात मोठी कंपनी होती नेस्ले इंडिया ही कंपनी युरोपातील असल्याने ती गाईच्या दुधापासून तयार करण्यात आलेल्या वस्तू (कन्डेन्स्ड मिल्क, दूध पावडर) विकत असे. भारतात म्हशींची संख्या जास्त असल्याने येथे म्हशीच्या दुधाच्या वस्तू तयार करणे जास्त योग्य होते. त्यात तांत्रिक अडचणी होत्या आणि म्हशीच्या दुधापासून भुकटी तयार करणे तेव्हा अशक्य वाटत होते. पण कुरियन यांच्या प्रयत्नांना यश मिळाले. त्यांनी म्हशीच्या दुधापासून भुकटी तर तयार केलीच शिवाय त्यापासून अनेक पदार्थ तयार करण्यात अमूलला यश आले. अमूलने हळूहळू बाजारपेठेत आपले स्थान पक्के केले. येथील लोकांच्या आवडी निवडी विचारात घेऊन दूध आणि त्यापासून तयार करण्यात आलेल्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध झाल्या. आज घडीला अमूल भारतासह ऑस्ट्रेलिया, चीन, सिंगापूर, हाँगकाँग, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, बांगलादेश, मॉरिशस, आखाती देश आणि आफ्रिâकेतील काही देशांमध्ये पोहोचले आहे. या यशाचे श्रेय वर्गीज कुरियन यांना जाते. याशिवाय भारत सरकारच्या मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या अधिपत्याखाली वर्गीस यांच्या हस्ते १६ जुलै १९६५ रोजी राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाची स्थापना करण्यात आली. मूत्रपिंडांच्या आजारामुळे वर्गीस कुरियन यांना नडियाद येथील रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले होते. ९ सप्टेंबर २०१२ रोजी त्यांचे निधन झाले.

२०१४ मध्ये, देशातील सर्व प्रमुख डेरी गटांनी, इंडियन डेरी असोसिएशनसह, कुरियन यांचा वाढदिवस, २६ नोव्हेंबर हा राष्ट्रीय दूध दिवस म्हणून साजरा करण्याचा संकल्प केला. मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटी आणि स्वीडिश युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्सेस यांनी त्यांना मानद पदवी प्रदान केली होती.

# 2030 पर्यंत देशातील 40 टक्के लोकांना पेयजल मिळणार नाही

## नीती आयोगाचा गंभीर इशारा

जागतिक लोकसंख्येच्या जवळपास १८ टक्के लोकसंख्या भारतात आहे, परंतु जगातील गोड्या पाण्याच्या संसाधनांपैकी केवळ ४ टक्के संसाधने भारताकडे आहेत. वर्ष २०३० पर्यंत पिण्याच्या पाण्याची मागणी पुरवठ्यापेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे व ४० टक्के लोकसंख्येला पिण्याचे पाणी मिळणार नाही,असा इशारा नीती आयोगाने दिला आहे. दिल्ली, बंगळुरू, चेन्नई आणि हैद्राबादसह २१ प्रमुख शहरांमध्ये शून्य भूजल पातळी होण्याची संभावना आहे. या जलसंकटाकडे गांभीर्याने न पाहिल्यास व त्यावर तातडीने शाश्वत उपाययोजना न केल्यास,भविष्यात भीषण परिस्थिती ओढवेल व पाणीटंचाईमुळे भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात ६ टक्के घट होऊ शकते.

जलसाक्षरतेचा अभाव ही देशासमोरील एक गंभीर समस्या आहे.पाण्याच्या अपव्यय,अयोग्य व्यवस्थापन आणि साठवणुकीच्या पद्धतींबद्दलच्या अज्ञानामुळे हे संकट दिवसेंदिवस गडद होत आहे. आज देशात वार्षिक जवळपास ४,००० अब्ज घनमीटर (१ घनमीटर = १,००० लिटर पाणी) पाऊस पडतो,पण त्यापैकी केवळ १,१२३ अब्ज घनमीटर पाणीच (२८ टक्के) वापरण्यायोग्य मानले जाते. केंद्रीय जल आयोगाच्या अहवालानुसार, आपल्या देशात पडणाऱ्या एकूण पावसाच्या पाण्यापैकी जवळपास ७८ टक्के पाणी पृष्ठभागावरून वाहून थेट महासागरात निघून जाते,व सर्वसाधारणपणे पावसाचे केवळ ८ ते १५ टक्के पाणीच जमिनीत मुरून भूजल पातळीत भर घालते. पाण्याच्या उपसा खुप मोठ्या प्रमाणावर आहे. जागतिक भूजल उपस्यात भारताचा वाटा अंदाजे २५ टक्के आहे.कृषी आणि औद्योगिक वापरासाठी होणारा अतिरिक्त उपसा,त्यासोबतच हवामान बदलामुळे पर्जन्यवृष्टी कमी झाल्यामुळे, भूजल पातळी आणि प्रमुख जलाशयांची क्षमता दोन्हीमध्ये गंभीर घट झाली आहे. त्यात जलसाक्षरतेचा अभाव. त्यामुळे पाण्याचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन व संवर्धन अत्यावश्यक आहे.तसेच लहानपणापासून मुलांना पाणी हे जीवन आहे व त्याची बचत व वापर कटाक्षाने काळजीपूर्वक करण्याचे संस्कार रुजवले पाहिजे. भारतात अयोग्य कृषी पद्धतीमुळे पाण्याचा अतिवापर होतो.भारतात उपलब्ध असलेल्या एकूण गोड्या पाण्यापैकी सुमारे ८० टक्के पाणी केवळ शेतीसाठी वापरले जाते. महाराष्ट्रासारख्या निम-शुष्क भागातही ऊस आणि भात यांसारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांचा आग्रह धरला जातो, ज्यामुळे भूजल पातळी झपाट्याने खालावत आहे.शहरी भागातील गैर व्यवस्थापन गळती,नळाद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यात गळती,आणि अनधिकृत जोडण्यांमुळे ३० ते ४० टक्के पाणी आधीच वाया जाते. सिमेंटच्या वाढत्या जंगलामुळे व सिमेंटच्या रस्त्यांमुळे भूजल पुनर्भरण न होणे ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. जलप्रदूषण आणि पुनर्वापराच्या अभावामुळे जलसंकट अजून तीव्र होत आहे. देशातील जवळपास ७५ टक्के नद्यांचे पाणी पिण्यासाठी अयोग्य आहे,ही एक चिंताजनक बाब आहे. करोडो रुपये खर्च करूनही नद्यांचे शुद्धीकरणचे उदिष्ट साध्य करणे कठीण जात आहे.

सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापरात आणण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. भारतात निर्माण होणाऱ्या एकूण सांडपाणी पैकी सुमारे २८ टक्के (महाराष्ट्रात ३६ ते ४६ टक्के)सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते.मात्र, या प्रक्रियेनंतर शुद्ध झालेल्या पाणी पैकी प्रत्यक्ष पुनर्वापर होण्याचे प्रमाण केवळ ३ टक्के ते ५ टक्कांच्या (महाराष्ट्रात ४ ते ५ टक्के) दरम्यान आहे. उर्वरित पाणी प्रक्रिया न करताच नद्या आणि जलस्रोतांमध्ये सोडले जाते.

### मग जलसंपत्तीच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी उपाययोजना कोणत्या?



भारताच्या भूजल वापर पैकी जवळपास ८७ टक्के वापर शेतीसाठी होत असल्याने, सिंचन कार्यक्षमतेतील अगदी किरकोळ सुधारणांचाही राष्ट्रीय जलसुरक्षेवर प्रचंड गुणात्मक परिणाम होतो. अचूक सिंचनामुळे बाष्पीभवन आणि खोलवर झिरपण्यामुळे होणारे पाण्याचे नुकसान, कमी होते. केवळ पाणीपुरवठा वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, जास्त पाणी लागणाऱ्या पिकाऐवजी (भात, ऊस) स्थानिक कृषी-हवामान क्षेत्राला अनुकूल असलेल्या पिकांकडे (भरडधान्ये, कडधान्ये) वळण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.राष्ट्रीय जल अभियानांतर्गत 'सही फसल' मोहीम शेतकऱ्यांना तांत्रिक आणि बाजारपेठांसंबंधी मार्गदर्शन पुरवते, तसेच त्यांना हवामानाशी जुळवून घेणारी आणि लक्षणीयरीत्या कमी सिंचन लागणारी पिके घेण्यास प्रोत्साहित करते.

स्थानिक समुदायांना (पाणी समित्या) पाण्याच्या स्रोतांची मालकी, संचालन आणि देखभाल करण्यासाठी सक्षम केल्याने उत्तरदायित्वाची भावना निर्माण होते. 'जल संचय जन भागीदारी' अभियानाच्या पाठिंब्याने आंध्र प्रदेशातील मुरुगुम्मी हे गाव,समुदाय-नेतृत्वाखालील जलसंधारणासाठी एक राष्ट्रीय आदर्श म्हणून उदयास आले आहे. ७१ जल संरचना बांधून आणि 'कड्यापासून दरीपर्यंत' पद्धतीची अंमलबजावणी करून, या गावाने ८.११ लाख घनमीटर पेक्षा जास्त पाण्याची पुनर्स्थापना केली. आज औद्योगिक 'शून्य द्रव विसर्जन' प्रगत सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली वापरून, कारखान्यांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करून ९८ टक्क्यांपर्यंत पाणी शुद्ध करता येते आणि ते पुन्हा कारखान्यांतच वापरले जाऊ शकते. यामुळे बाहेरच्या जलस्रोतांमध्ये एक थेंबही सांडपाणी सोडले जात नाही.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता युगात 'स्मार्ट' तंत्रज्ञान आणि डेटाचा उपयोग करून शाश्वत जल व्यवस्थापन करणे शक्य आहे. आयओटी-आधारित सेन्सर्स, एआय-आधारित गळती शोधन आणि सॅटेलाइट मॅपिंगमुळे रिअल-टाइम जल-अंदाजपत्रक तयार करणे शक्य होते आणि जुन्या शहरी पाईप लाईन मधील गळतीची प्रमुख ठिकाणे ओळखण्यास मदत होते .जीआयएस-आधारित रिमोट सेन्सिंग यांसारख्या साधनांचा उपयोग पाणीटंचाई असलेल्या प्रदेशांचे मॅपिंग करण्यासाठी केला जात आहे, ज्यामुळे सरसकट धोरण लागू करण्याऐवजी पुराव्यांवर आधारित उपाययोजना करणे शक्य होते.वापरलेल्या पाण्याला कचरा न मानता एक संसाधन म्हणून हाताळले पाहिजे. शहरी विकास चक्रात सांडपाणी प्रक्रियेचे एकत्रीकरण केल्याने गोड्या पाण्याची मागणी कमी होते आणि नैसर्गिक नदी प्रणालींचे प्रदूषण टाळता येते. उदाहरणार्थ,नागपूर शहरात सांडपाण्यावर तृतीयक मानकांपर्यंती प्रक्रिया करून ते महाजेनको औष्णिक वीज प्रकल्पाला शीतलीकरणासाठी विकते, ज्यामुळे गोड्या पाण्याची बचत होते व नागपूर महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडते. निसर्ग-आधारित शहरी "स्पंज" उपाययोजना ज्यात सच्छिद्र पदपथ,पाणथळ जागा आणि शहरी जंगले यांचा समावेश असतो, राबवून, शहरांना नैसर्गिकरित्या पावसाचे पाणी साठवून ठेवण्यास मदत करता येते.चेन्नई शहराने शहरी पूर कमी करण्यासाठी आणि भूजल झिरपण्याची क्षमता वाढवण्यासाठी आपल्या शहरी पाणथळ जागांचे सक्रियपणे पुनरुज्जीवन केले आहे आणि सच्छिद्र पायाभूत सुविधा एकत्रित केल्या आहेत, ज्यामुळे हे शहर मूलतः जल-संचयन युनिट बनले आहे.

भारतातील पाणीटंचाईवर उपाययोजना करण्याच्या उद्देशाने सरकारतर्फे पण विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक व्यक्तीला ५५ लिटर प्रति दिन शुद्ध पाणी देण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच या पाण्याचा वापर झाल्यानंतर निर्माण होणारे सांडपाणी (ग्रे वॉटर) व्यवस्थापनाचे उद्दिष्ट, ज्यामुळे पुनर्वापर आणि अपव्यय नियंत्रण,आरोग्य आणि स्वच्छता,भूजल पातळीत वाढ ,पर्यावरण संवर्धन व स्थानिक पातळीवर स्वावलंबन हे टप्पे आहेत.प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनाव्दारे 'प्रति थेंब पीक' गुणोत्तर वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन (ठिबक आणि तुषार सिंचन पद्धती) अवलंबण्यास प्रोत्साहन दिले जाते. एकंदरीत जलसंकटावर मात करण्यासाठी पावसाचे पाणी साठवणे (वॉटर हार्वेस्टिंग), जलसंवर्धन (पाण्याची बचत), प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर आणि पाणलोट व्यवस्थापन यांसारख्या शाश्वत उपाययोजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारताचे जलसंकट हे एक बहुआयामी आव्हान आहे, जे हवामान बदल आणि संसाधनांच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे अधिकच गंभीर झाले आहे. संकटापुरत्या मर्यादित प्रतिसादांच्या पलीकडे जाऊन, भारताने चक्रीय जल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल केली पाहिजे, सूक्ष्म सिंचनाला प्राधान्य दिले पाहिजे आणि समुदाय-नेतृत्वाखालील प्रशासनाला संस्थात्मक स्वरूप दिले पाहिजे. दीर्घकालीन जलसुरक्षा सुनिश्चित करणे हे केवळ एक धोरणात्मक उद्दिष्ट नसून भारताच्या विकासासाठी एक अस्तित्वाची गरज आहे.

प्रा. संजय त्रिंबकराव खडक्कार,
माजी तज्ज्ञ सदस्य,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ. मो. 7276614260

# एनसीएमसी कार्ड मागे टक्केवारीचा खेळ!

## एनसीएमसी कार्ड सक्ती प्रवाशांच्या हिताची की एजंटाच्या?

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला:** प्रवाशांच्या हिताची म्हणून मोठा गाजावाजा करण्यात आलेल्या एनसीएमसी कार्ड च्या सक्तीमागील टक्केवारीची मोठ्या प्रमाणात प्रवाशांमध्ये चर्चा होत आहे. एस टी महामंडळाने ज्येष्ठ नागरिक महिला सन्मान योजनेतील लाभार्थी तसेच अमृत योजनेतील प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्डचा वापर बंधनकारक केल्यानंतर या कार्डच्या रिचार्ज च्या नावाखाली प्रवाशांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत प्रवास करण्यापूर्वीच 500 किंवा हजार रुपयांचे रिचार्ज करून त्यातून शुल्क वजा केले जात असेल तर ही व्यवस्था प्रवाशांच्या हिताची कशी? असा सवाल प्रवासी करीत आहेत




### कंडक्टर व खाजगी एजंटच्या रिचार्ज मध्ये तफावत

» एनसीएमसी कार्ड काढताना अधिक पैसे घेतल्याच्या तक्रारीनंतर आता रिचार्ज करतानाही खाजगी एजंट आणि एसटी कंडक्टर कडून मिळणाऱ्या रकमेत मोठी तफावत असल्याचे समोर येत आहे जर खाजगी एजंट कडे पन्नास रुपयाचे रिचार्ज केले तर कार्ड मध्ये 37. 67 रुपये तर एसटी कंडक्टर कडून रिचार्ज केल्यास 49 . 47 रुपये जमा होतात. शंभर रुपयाच्या रिचार्ज वर खाजगी एजंट कडे 87 . 14 तर कंडक्टर कडे 98 . 94 रुपये तर दोनशे रुपयांच्या रिचार्ज 186.08 तर एसटी कंडक्टर कडे 197.88 रुपये उपलब्ध होतात. तर पाचशे रुपयांच्या रिचार्ज वर खाजगी एजंट मार्फत 482.89 रुपये तर एसटी कंडक्टर कडून 494.70 रुपये उपलब्ध होतात त्यामुळे खाजगी एजंट मार्फत रिचार्ज केल्यास प्रवाशांना अधिक शुल्काचा भार सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी येत आहेत

### एनसीएमसी कार्ड सक्ती नेमकी कशासाठी.....

» सवलतीच्या प्रवाहासाठी आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र उपलब्ध असताना यांची एम सी कार्ड ची सक्ती का करण्यात आली असा प्रश्नही प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे या व्यवस्थेमुळे खाजगी संस्थेला आर्थिक लाभ मिळतो का याबाबत एसटी महामंडळाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी अशी मागणी होत आहे एनसीएमसी कार्डची सक्ती तातडीने रद्द करावी किंवा एनसीएनसी कार्ड चे रिचार्ज एसटीच्या तिकीट खिडकीवर आणि कंडक्टर कडून कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता उपलब्ध करून द्यावे अशी मागणी प्रवासी करीत आहेत

# ढोल-ताशांचा निनाद अन् 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष

## श्रीराम प्रतिष्ठानच्या बाप्पांचे थाटात आगमन !







प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले असून, सुधीर कॉलनी जवाहर नगर येथील श्रीराम प्रतिष्ठानच्या बाप्पाचे मंगळवारी, ८ सप्टेंबर रोजी अत्यंत जल्लोषात आणि भक्तीमय वातावरणात आगमन झाले. प्रसिद्ध मूर्तिकार अंकित आंबेरे यांनी साकारलेली श्रीराम प्रतिष्ठानची आकर्षक गणेशमूर्ती पाहण्यासाठी गणेशभक्तांची मोठी गर्दी झाली होती. आगमनादरम्यान ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. श्रीराम प्रतिष्ठानच्या बाप्पाचे आगमन झाल्यावर पंकज देशमुख यांच्या हस्ते श्रींना पुष्पहार अर्पण करून जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बाप्पाच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी जय्यत तयारी केली होती, ज्यामुळे आगमन सोहळ्याची शोभा अधिकच वाढली.

# अन् क्षणभर विसावली पावले...



प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला:** भक्ती, शक्ती अन् श्रद्धेचा अनोखा संगम असलेल्या शहरातील श्री राजराजेश्वर कावड व पालखी महोत्सवात हजारो भाविक सहभागी होतात. यांच्या सेवेसाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आरआरसी समूहाने गांधीरोड स्थित मुख्य कार्यालयासमोर भव्यदिव्य असा कावडधारकांसाठी स्टेज उभारला होता. या स्टेजवर प्रत्येक कावडधारकांच्या अध्यक्षांचे मन:पूर्वक शाल आणि प्रशस्तीपत्र देऊन स्वागत करण्यात आले. तसेच कावड यात्रा पाहणाऱ्या भाविकांचे विविध कार्यक्रमांद्वारे मनोरंजन केले.

आरआरसी समूहाने बालगोपालांना आपली कला सादर करण्याचीही संधीही दिली. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन आरजे श्री यांनी केले. हे संचालन आणि चिमुकल्यांचा नृत्याविष्कार पाहण्यासाठी आरआरसी नेटवर्कसमोर शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती.

कावड व पालखी पाहण्यासाठी आलेले भाविक या भव्यदिव्य स्टेजवरील कार्यक्रम पाहण्यासाठी थांबत होते. एकूण हा कार्यक्रम भाविकांच्या व शिवभक्तांच्या आकर्षणाचे केंद्र ठरला होता. यासाठी आरआरसी समूहाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतल्याच्या प्रतिक्रिया भाविकांमधून उमटत होत्या.

# राज्यातील भरती परीक्षा पद्धतीत होणार सुधारणा!

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे.

या समितीच्या कार्यकक्षेनुसार राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ व इतर संबंधित हितधारकांशी चर्चा करून भरती परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी सूचना, शिफारशी, हरकती व अभिप्राय प्राप्त करून घेतले जाणार आहेत. अमरावती विभागातील संबंधित हितधारकांशी चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष व सदस्य १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ५.३० दरम्यान नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे भेट देणार आहेत. या अनुषंगाने अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती व उपजिल्हाधिकारी (महसूल) अमरावती यांच्या संयुक्त नियंत्रणाखाली विशेष कक्षामार्फत १४ ते १६ सप्टेंबर या कालावधीत, कार्यालयीन वेळेत सूचना व अभिप्राय स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यातील भरती परीक्षा पद्धत अधिक सक्षम, सुरक्षित, पारदर्शक व विश्वासार्ह करण्याच्या दृष्टीने अमरावती विभागातील सर्व संबंधित घटकांनी आपल्या सूचना, शिफारशी, हरकती व निवेदने सादर करून या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, अमरावती यांनी केले आहे.

# शेगाव-चंद्रपूर बसमध्ये प्रवास करणाऱ्या मुलगा गंभीर जखमी

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**शेगाव :** शेगाव डेपोची MH40Y 5902 क्रमांकाची शेगाव-चंद्रपूर जाणारी बस शेळद फाटा येथे ट्रकला ओव्हरटेक करत असताना खिडकी जवळ बसमध्ये प्रवास करणाऱ्या एका मुलाच्या हाताला गंभीर दुखापत झाल्याची घटना समोर आली आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विकास काझनेकर नामक मुलगा बसमध्ये प्रवास करत होता. बस ने समोरील ट्रक ला ओव्हरटेक करत असताना त्याच्या हाताला गंभीर दुखापत झाली. या घटनेनंतर बसमधील प्रवाशांमध्ये काही काळ खळबळ उडाली.जखमी विकास काझनेकर याला बसमधील प्रवाशांनी उचलून तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, ही घटना नेमकी कशामुळे घडली, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

# अपात्र असतांना श्रावणबाळ योजनेचा घेतलेला लाभ परत करा !

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**खामगाव :** श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचा जनार्दन विश्वनाथ दळी रा. सुटाळपुरा, खामगांव यांना अपात्र पद्धतीने लाभघेतल्याप्रकरणी खामगावचे नायब तहसीलदार यांनी संबंधित लाभार्थ्यास १८ हजार अनुदानाची रक्कम शासन जमा करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकाराबाबत ४ ऑगस्ट २०२६ रोजी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत जनार्धन विश्वनाथ दळी यांची प्रत्यक्ष गृहचौकशी करण्यात आली. चौकशी अहवालामध्ये संबंधित व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न योजनेच्या निर्धारित पात्रता निकषापेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास आले. चौकशीत जनार्धन दळी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेसाठी अपात्र असल्याचे निष्पन्न झाल्याने, जुलै २०२५ ते जून २०२६ या कालावधीत प्राप्त झालेले १८,०००/-अनुदान शासनाकडे परत जमा करण्याचे निर्देश नायब तहसीलदार, खामगाव यांनी दि. २४/८/२६ रोजी दिले आहेत. सदर रक्कम शासन जमा करून त्याची पावती कार्यालयात सादर करावी, अन्यथा प्रचलित शासन नियमानुसार महसुली थकबाकी म्हणून वसुलीची कारवाई करण्यात येईल.

# दुष्काळसदृश परिस्थितीत धोरणात्मक नियोजनाची गरज!

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख तसेच डॉ.एस.एस.माने, संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला व डॉ.जे.व्ही.एन.एस. प्रसाद, प्रकल्प समन्वयक, यांच्या मार्गदर्शनात ४ सप्टेंबर रोजी खरीप हंगामात विदर्भातील सद्य दुष्काळसदृश पर्जन्यमानाच्या परिस्थितीत कोरडवाहू शेतीसाठी आपत्कालीन पीक नियोजनाबाबत भागधारकांचे ऑनलाईन बैठकीचे आयोजन यशस्वीरीत्या करण्यात आले.

सध्या खरीप हंगामामध्ये अपुरा व अनियमित पाऊस झाल्यामुळे विभागातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दीर्घकाळ झालेल्या पावसाच्या खंडामुळे पेरणीची कामे, पिकांची उगवण व स्थापनता तसेच पिकांची एकूण वाढ यावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. परिणामी, पिकांचे व्यवस्थापन तसेच पर्यायी कृषी पद्धतींबाबत शेतकऱ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. वरील परिस्थितीच्या अनुषंगाने आपत्कालीन पीक नियोजन तसेच सद्य परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी योग्य पीक व्यवस्थापन धोरणे निश्चित करण्याच्या उद्देशाने बैठकीचे आयोजित करण्यात आले होते. या बैठकीला विभागीय कृषी उपसंचालक, अमरावती व अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, वर्धा या जिल्ह्यातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक, कृषी विज्ञान केंद्राचे चे कार्यक्रम समन्वयक, विषय विशेषज्ञ असे एकून ८५ सदस्यांनी सहभाग नोंदविला. बैठकीच्या प्रारंभी मुख्य शास्त्रज्ञ, डॉ. अनिता चोरे यांनी सद्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बैठकीचे महत्व स्पष्ट केले. तसेच, अकोला केंद्राने विकसित केलेल्या विविध परिस्थितीशी जुळवून घेणाऱ्या व शेतकऱ्यांना सहजपणे अवलंबता येणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून सद्य परिस्थितीवर मात करण्यासाठी धोरणात्मक नियोजन करण्याचे आवाहन केले. यावेळी अनेक राज्यस्तरीय कृषी अधिकाऱ्यांनी य उपाययोजनांना सहमती दर्शवून त्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांपर्यंत सदर शिफारशी व तंत्रज्ञान पोहोचविण्याची ग्वाही दिली. बैठकीदरम्यान डॉ. ए. आर. तुपे, कृषी हवामानशास्त्रज्ञ यांनी एल निनोच्या प्रभावाबाबत माहिती दिली. डॉ. राजेश पातोडे यांनी असंतृप्त मृदा क्षेत्रातील मृदा आर्द्रता व्यवस्थापन, उपलब्ध पाण्याचे प्रमाणीकरण याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. संजय काकडे, कापूस पिकाबाबत शेतकऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. बैठकीदरम्यान विविध कृषी अधिकाऱ्यांनी पिकांवरील पाण्याच्या ताणाच्या परिस्थितीमध्ये करावयाच्या उपाययोजना, पीक व्यवस्थापन व पर्यायी धोरणांबाबत अनेक प्रश्न विचारले. यावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

# पाणी वाचवण्याची गरज असताना नासाडी सुरूच

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला:** जुलै महिन्यातील एक पाऊस सोडल्यास पावसाने पाठ फिरवली आहे. काटेपूर्णा जलाशयातील साठा दररोज घटतो आहे. पाण्याचा थेंब न थेंब वाचवण्याची गरज असताना नासाडी सुरूच आहे. यामुळे जलसंकट अधिक भीषण होणार ही जाणीव ठेवावी लागेल. आज सकाळी न्यू तापडिया परिसरात वॉल्व लिकेजमुळे पाण्याचे पाट वाहत होते. याला त्वरित आळा घालावा लागेल. सध्या पावसाची रंगत दिसत नाही. त्यामुळे लोकांना पाणी उपलब्ध व्हावे यासाठी उपाय योजना



केल्या जात आहे. उपलब्ध पाणी कशा प्रकारे वापरले जाईल यासाठी निर्णय घेतले जात आहे. ऐन पावसाळ्यात ही कामे सुरू असल्याने भीषणता लक्षात यावी. अशा वेळी पाणी वाहून जाणे हिताचे नाही. आज सकाळी बराच वेळ काळे यांच्या निवासस्थान नजीकचा वॉल्व लिकेज झाला आणि दुर्गे यांच्या घरापर्यंत पाण्याचे लोट वाहत होते.

# शिवसेना शिंदे गटाच्या चार नगरसेवकांना अपात्र करण्याबाबतचा ठराव घ्या..!

## 12 नगरसेवकांचे नगराध्यक्ष यांना पत्र, सभेत गदारोळ घालणे नगरसेवकांना भोवणार..?

प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**हिवरखेड :** शिवसेना शिंदे गटाच्या चार नगरसेवकांनी लज्जास्पद वर्तन केल्यामुळे त्यांना महाराष्ट्र नगरपरिषद व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 च्या कलम ४२ (१) व सहकलम ४२ (3) अन्वये अपात्रतेचा ठराव पारित करण्याबाबत 12 नगरसेवकांनी नगराध्यक्ष सुलभा रमेश दूतोंडे यांना पत्र दिले आहे.

सदर अर्जामध्ये शिवसेना शिंदे गटाचे रवी मधुकर घुंगड, ऋषिकेश श्रीकृष्ण पंचबुद्धे, रामेश्वर पुंडलिक हागे तथा स्वीकृत नगरसेवक श्यामशील सहदेवराव भोपळे या चार नगरसेवकांनी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण व विशेष सभेत गदारोळ घालने, नगरपरिषदेच्या सभांमध्ये व्हिडिओ शूटिंग करून




व्हाट्सअप ग्रुप वर आक्षेपार्य पोस्ट करणे, वारंवार नगरपरिषदेला पत्र देऊन वेगवेगळी आंदोलने करण्याचे इशारे देणे, नगरपरिषद कार्यालयात बसण्यासाठी स्वतंत्र कॅबिन मागून ते न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा देणे, नागरिकांनी नगरपरिषदेचे कर न भरण्याबाबत व्हिडिओ काढून तो सोशल मीडियावर व्हायरल करणे अशा विविध कारणावरून भारतीय जनता पक्षाच्या अनिता रवींद्र वाकोडे, प्रतिभा वीरेंद्र येऊल, वंदना राजेश वानखडे, अजीज खान जमीर खान, वैभव रमेश गावंडे, रोशन खा रसूल खा, प्रमिला रवींद्र मानकर, दीपक बाबन रायबोले, वैशाली गणेश वानखडे, दिपाली संदीप इंगळे, प्रथमेश श्रीराम नाठे, किरण लालजी सेदानी या बारा नगरसेवकांनी महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 कलम 81 (2) अन्वये विशेष सभा बोलावून शिवसेना शिंदे सेनेचे रवी मधुकर घुंगड, ऋषिकेश श्रीकृष्ण पंचबुद्धे, रामेश्वर पुंडलिक हागे तथा स्वीकृत नगरसेवक श्यामशिल सहदेव भोपळे या चार नगरसेवकांना लज्जास्पद व गैरवर्तन केल्याबाबत कलम 42 (1) तथा सह कलम 42 (3) अन्वये विचार करून अपात्रतेचा ठराव पारित करण्याबाबत चा अर्ज दिला असून या अर्जाच्या प्रति मुख्याधिकारी नगरपरिषद हिवरखेड, जिल्हाधिकारी तसेच प्रधान सचिव नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांना सुद्धा पाठविले आहेत. यावर नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे ह्या विशेष सभा बोलून तसा ठराव पारित करतात काय याकडे हिवरखेड वासियांचे आता लक्ष लागले आहे.

# गोरक्षकाच्या घरासमोरील दोन गोवंशाची चोरी, एका चोरट्यास अटक






प्रतिनिधी ९ सप्टेंबर

**अकोला:** सिविल लाईन पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या प्लॉट परिसरातील बजरंग दलाचे कार्यकर्ते तसेच गोरक्षक हरिओम पांडे त्यांच्या घरासमोर बांधलेल्या गोवंशाची चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या वडीलावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत दोन गोवंश घेऊन चोरट्यांनी फरार होण्याचा प्रयत्न केला परंतु त्यातील एकाच पकडण्यास परिसरातील नागरिकांना यश आले.

ही घटना आज बुधवारी पहाटे चार वाजे दरम्यान घडली. परिसरातील नागरिकांनी या घटनेची माहिती सिविल लाईन पोलिसांना दिल्यानंतर पकडलेल्या गोवंश पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले गोवंश चोरीसाठी वापर करण्यात आलेला एक ऑटो सुद्धा पोलिसांनी जप्त केला घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनला बजरंग दल कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.

हरिओम पांडे यांनी अनेक गोवंशांना चोरट्यांच्या तावडीतून वाचवले आहे त्या रागातून पहाटे चार वाजता त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न या चोरट्यांचा असावा अशी प्रतिक्रिया यावेळी विश्व हिंदू परिषदेचे राजु मंगरूळकर यांनी व्यक्त केली

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि. ९ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


आर्थिक देवाण-घेवाणीतून कामाचा भार...
तहसीलदार बनल्या 'रिल्स स्टार'!
कार्यालयातच रील शूट करून शासकीय नियमांना पायदळी तुडवत 'चमकोगिरी
शासनाने तहसीलदारावर निलंबनाची कारवाई केली पाहिजे
सोशल मीडियावरून रील व्हिडिओ हटवला, ११ पैकी ८ पोस्ट डिलीट

# प्रत्येक कामासाठी आर्थिकतेचे अवलंबन, सर्व प्रकरणाची चौकशी करून करा निलंबन!

## * शासकीय खुर्चीवर बसून शासनाच्या आदेशाला केराची टोपली * रिल स्टार तहसीलदाराची राज्यभर चर्चा

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

शासकीय पदाचा आणि कार्यालयाचा वापर वैयक्तिक प्रसिद्धीसाठी करता येत नाही.मात्र वाशिम जिल्ह्यातील रिसोडच्या तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी प्रतीक्षा तेजनकर या उच्च पदावर असतांना कदाचित या नियमांचा त्यांना विसर पडला . दरम्यान चक्क तहसील कार्यालयातच 'प्रोफेशनल सिनेमॅटिक रील' शूट करून शासनाच्या आदेशांना तेजनकरांनी केराची टोपली दाखवून दिली आहे. 'लाईट, कॅमेरा आणि ?क्शन'च्या थाटात तयार केलेली रील प्रकरणाची सध्या राज्यभरात चर्चा होत आहे.मागच्या वर्षी नांदेड जिल्ह्यातील उमरीच्या एका तहसीलदाराने निरोप समारंभ कार्यक्रमात तहसीलदाराच्या कुर्सीवर बसून गाणं गायल्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.तहसीलदार तेजनकरांनी देखील रील शुट करून शिस्तभंग केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.त्यामुळे दिरंगाई न करता त्यांच्यावर सुद्धा थेट निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी आता सर्व स्तरातून केली जात आहे.

रिसोड तहसील मध्ये नागरिकांना प्रत्येक कामासाठी आर्थिकतेचे अवलंबन केल्या जात असल्याच्या तक्रारी ही वरिष्ठाकडे केले आहेत.वाशिम जिल्ह्यातील रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर शासकीय कार्यालयात रील शूट केल्या प्रकरणी सध्या वादात सापडल्या आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २८ जुलै २०२५ रोजी स्पष्ट परिपत्रक जारी केले आहे. या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे प्रत्येक शासकीय अधिकाऱ्यासाठी बंधनकारक आहे. मात्र, तहसीलदार तेजनकरांनी या सर्व नियमांना पायदळी तुडविले आहे.परिपत्रकातील नियम १० नुसार, वैयक्तिक सोशल मीडिया अकाउंटवर फोटो, रील किंवा व्हिडिओ अपलोड करताना शासकीय पदनाम, लोगो, गणवेश तसेच शासकीय इमारत व वाहनांचा वापर करण्यास सक्त



मनाई आहे. मात्र, तेजनकर यांनी आपल्या रीलमध्ये 'तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी' असा नावाचा फलक, शासकीय खुर्ची, राष्ट्रीय ध्वज आणि बोधचिन्ह स्पष्टपणे दाखवून नियमालाच केराची टोपली' दाखवली आहे. तर परिपत्रकातील नियम ८ आणि ९ मध्ये शासकीय कामाचे प्रदर्शन करताना किंवा सोशल मीडियावर पोस्ट करताना 'स्वयंप्रशंसा' होणार नाही, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. तरीही, वैयक्तिक प्रसिद्धीच्या मोहापोटी कार्यालयातच व्यावसायिक कॅमेरामन लावून हे रील शूट करण्यात आले आहे. ?शासनाने जारी केलेल्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक १४



नुसार, या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यावर 'महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९' अन्वये कडक शिस्तभंगविषयक कारवाईची तरतूद आहे. मागील वर्षी नांदेड जिल्ह्यातील उमरीचे तत्कालीन तहसीलदार प्रशांत थोरात यांनी त्यांच्या कार्यालयातील शासकीय कुर्सीवर बसून निरोप समारंभाच्या कार्यक्रमात 'यारा 'तेरी यारी को मैने तो खुदा माना' हे प्रसिद्ध गाणं गायले होते.हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता.त्यामुळे त्या तहसीलदारावर प्रतिमा मलिन झाल्याचा महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणूक) नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. त्यामुळे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार व नांदेड जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालावरून छत्रपती संभाजी नगरच्या आयुक्तांनी उमरीच्या त्या तहसीलदारावर थेट निलंबनाची कारवाई केली होती. सर्व सामन्य नागरिक असो किंवा मोठा अधिकारी कायदा आणि नियम हा सर्वांसाठी समान असतो.हे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याआधी नांदेड येथे दाखवून दिले आहे.नांदेडच्या उमरी येथील तहसीलदारांनी शिस्तभंग केले होते.रिसोडच्या तहसीलदार यांनीही शिस्तभंग केले आहे.त्यामुळे आता या प्रकरणात सुद्धा तहसीलदार प्रतीक्षा तेजनकरांवर थेट निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हा वासिंयामधून होत आहे.मात्र ही कारवाई कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# मृत्यूनंतर पाहण्यासाठी सृष्टी, खासदार-आमदार दान करणार दृष्टी!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

अंधत्व निर्मूलनाच्या लढ्याला बळ देत नेत्रदान चळवळीला व्यापक स्वरूप देण्यासाठी वाशिम जिल्ह्यात विशेष नेत्रदान प्रतिज्ञा अभियान राबविण्यात आले. या अभियानात लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी स्वतः नेत्रदानाची प्रतिज्ञा करून नागरिकांना मानवतावादी कार्यासाठी पुढे येण्याचा संदेश दिला.

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख, वाशिम-मालेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्यामभाऊ खोडे आणि कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई डाहाके यांनी अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेत नेत्रदानाची प्रतिज्ञा केली. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि

## नेत्रदानाच्या संकल्पातून प्रकाशाची वाट



पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.मृत्यूनंतरही डोळ्यांच्या माध्यमातून दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करता येतो, हा संदेश या अभियानातून देण्यात आला. नेत्रदानाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती वाढविणे, गैरसमज दूर करणे आणि अधिकाधिक नागरिकांना या मानवतावादी उपक्रमाशी जोडणे आवश्यक असल्याचे उपस्थितांनी सांगितले. जिल्ह्यात नेत्रदान चळवळीला व्यापक स्वरूप देण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी स्वतः नेत्रदानाची प्रतिज्ञा केल्याने या चळवळीला निश्चितच चालना मिळणार आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी पुढे येऊन नेत्रदानाची प्रतिज्ञा करावी, असे आवाहन प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोबरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद शिंदे, नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे आणि संदीप आंबेकर यांनी विशेष पुढाकार घेतला.

# रिसोड तहसीलदारा ची 'सिनेमॅटिक रिल्स' पोहोचणार महसूलमंत्र्याच्या दालनात!

**रयत क्रांती संघटनेच्या युवा जिल्हाध्यक्षांची तक्रार; कारवाईची मागणी.**

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

तहसीलदार तेजनकर यांनी सोशल मीडिया वर प्रसारित केलेल्या 'सिनेमॅटिक रिल्स'चा मुद्दा चांगलाच चर्चेत आला असून, या प्रकरणाची तक्रार रयत क्रांती संघटनेच्या युवा जिल्हाध्यक्ष सतीश देशमुख यांनी जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे दाखल करत कारवाईची मागणी केली असून सदर निवेदन महसूल मंत्री मा ना चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठविण्यात आले असल्याची माहिती दिली आहे.

त्यामुळे आता हे प्रकरण महसूलमंत्र्याच्या दानात पोहोचले आहे आता काय कारवाई होणार याकडे नागरिकांची लक्ष लागले आहे.

रयत क्रांती संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी दिलेल्या तक्रारी मध्ये नमूद करण्यात आले आहे की येथील तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांनी त्यांच्या अधिकृत शासकीय कार्यालयात कार्यालयीन वेळेत शासकीय खुर्चीचा व अशोक चिन्हाचा वापर करून इंस्टाग्राम साठी रिल्स तयार करून त्याच्या वैयक्तिक इंस्टाग्राम अकाउंट वर प्रसारित केली आहे हे कृत्य वर्तणूक नियम १९७९ चे उल्लंघन करणारे असून शासकीय पदाला अशोभनीय वर्तन करणारे आहे तसेच शासकीय कामकाजाच्या वेळेचा गैरवापर झाला आहे. त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी सतीष देशमुख यांनी केली आहे.

## थोडक्यात

### मंगरूळपीर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरूळपीर तालुका दुष्काळ ग्रस्त म्हणून जाहीर. करणार मंगरूळपीर तालुक्यातील दाभा येथे कावड यात्रेनिमित्त आमदार शाम भाऊ खोडे यांनी भेट दिली पावसाने तरी दिल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून त्यांना शासन स्तरावर मदत मिळावी शेतकरी आज संकटात सापडल्यामुळे तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा मिळावा असे आश्वासन देऊन कावड यात्रेचे पूजन केले.

यावेळी युवा मोर्चा तालुका अध्यक्ष अनिल भुसारे, सरपंच गोपाल भुसारे, कावड अध्यक्ष ज्ञानेश्वर पावडे, अवि जाधव, कोडबा मोटे, हरिचद भुसारे, किशोर मोटे, मदन पोस्टमन, गणेश पोस्टमन, व इतर गावकरी मंडळी उपस्थित होते.

### तंबाखू नियंत्रण पथकाची धडक कारवाई

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**२,६०० रुपयांचा दंड वसूल**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालयाच्या वतीने वाशिम शहरात तंबाखूविरोधी विशेष मोहीम राबविण्यात आली. आरोग्य विभाग, पोलिस विभाग तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या संयुक्त पथकाने शहरातील विविध भागांत तपासणी करून तंबाखू नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत एकूण २ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी आणि बाह्य संपर्क अधिकारी डॉ. प्रसाद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. जिल्हा क्रीडा संकुल, पोस्ट ऑफिस, जलसंपदा व बांधकाम विभाग कार्यालय परिसर, पाटणी चौक, सिंधी कॉलनी आणि अकोला नाका या ठिकाणी पथकाने कारवाई केली.

# कारागृहात 'तणावमुक्त जीवन' कार्यशाळा

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशीम जिल्हा कारागृहातील बंदीजनांच्या मानसिक स्वास्थ्याला सकारात्मक दिशा देण्यासाठी तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशन, पुणे (हॅपी थॉट्स) ज्ञानध्यान केंद्र, वाशिम यांच्या वतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी 'तनावमुक्त जीवन (ए्री इीा र्थी)' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुरुष व महिला बंदीजनांसाठी स्वतंत्रपणे घेण्यात आलेल्या या दोन्ही कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमांतर्गत तेजज्ञान फाउंडेशनतर्फे सरश्री यांनी लिहिलेली जीवनाला सकारात्मक दिशा देणारी विविध विषयांवरील पुस्तके वाशिम जिल्हा कारागृहाच्या ग्रंथालयासाठी भेट देण्यात आली. पुरुष बंदीजनांसाठी आयोजित



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डआशिष सिताराम जामकर व डॉ. सखाराम वामनराव दुबे यांनी केले. राजेश गुलाबराव वाघमारे यांनी सहकार्य केले. महिला बंदीजनांसाठीच्या कार्यक्रमात गायत्री राजेश वाघमारे व दीपा सुरेश मंतोडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच ज्ञानेश्वरी श्याम इंगळे यांचेही सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी वाशिम जिल्हा कारागृहाचे अधीक्षक गजानन सरोदे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. . कारागृह प्रशासनाने या उपक्रमाचे कौतुक करत तेजज्ञान फाउंडेशनच्या सर्व सदस्यांचे आभार व्यक्त केले.

# कृषी पंपांसाठी दिवसा १२ तास वीजपुरवठ्याची मागणी!

***महावितरणच्या अधिकाऱ्यांना, लाज वाटायला पाहिजे,**
***चिखली शेतशिवारातील वीस दिवसांपासून जळालेला ट्रान्सफॉर्मर बदललेला नाही**

• दिपक मापारी @ रिसोड •

पावसासाठी एकीकडे आभाळाकडे डोळे लावून बसलेले कोरडवाहू शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत, तर दुसरीकडे सिंचनाची सुविधा असलेले शेतकरी उपलब्ध पाण्याच्या जोरावर सोयाबीनचे पीक जगविण्यासाठी अक्षरशः धडपड करीत आहेत. मात्र या शेतकऱ्यांसमोरही आता वीजपुरवठ्याची मोठी समस्या उभी ठाकली आहे.

कृषी पंपांसाठी दिवसाला आठ तास वीजपुरवठा दिला जात असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात तांत्रिक बिघाड आणि वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना निम्म्या वेळेतही सुरळीत वीज मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत.त्यामुळे कृषी पंपासाठी सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन दिवसा किमान १२ तास अखंडित वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. गेल्या तब्बल २२ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. विशेषतः सध्या ऐन फुलोऱ्यात असलेल्या सोयाबीन पिकाला पाण्याची नितांत गरज असताना पावसाने पाठ फिरवल्यामुळे अनेक शेतांमधील सोयाबीन पिकांनी माना टाकण्यास सुरुवात केली आहे. जमिनीतील ओलावाही झपाट्याने कमी होत असल्याने फुलगळ होण्याची आणि परिणामी उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

सध्या पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे कृषी पंपांवर शेतकऱ्यांची भिस्त आहे. शेतातील विहीर, बोअरवेल, नदी-नाल्यांमधील उपलब्ध पाणी किंवा अन्य सिंचन साधनांच्या माध्यमातून पिकांना पाणी



देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र वीजपुरवठा सुरळीत नसल्याने पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले आहे.

# रिसोड पोलिसांचे कोम्बिग ऑपरेशन!

## चार आरोपी ताब्यात, ४.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

रिसोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी मालमत्तेविषयक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबवली. दि. ७ सप्टेंबर रोजी पहाटे ३.३० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नाकाबंदी व कॉम्बिंग ऑपरेशन करण्यात आले. या कारवाईत चार आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून ५ मोटारसायकली, ३ पाण्याचे मोटारपंप, पाईप, इलेक्ट्रिकल साहित्य, चोरीसाठी वापरलेली औजारे व ३ मोबाईल असा एकूण ४ लाख ४५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या मोहिमेदरम्यान बिबखेडा व



मोठेगाव परिसरात सर्च ऑपरेशन राबवण्यात आले. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे गोविंदा मनोहर भोसले (३२), राजू मनोहर भोसले (२८), विजय मनोहर भोसले (२७) आणि विशाल भारत भोसले (२९) या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपींची सखोल चौकशी केली असता रिसोड पोलीस ठाण्यातील दोन चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून, आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.चोरीच्या गुन्ह्यांमध्ये संजय किशोर पवार, संजय बबन भोसले आणि प्रदीप उर्फ खापर्या सावजी पवार यांचाही सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. हे तिघे फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. तसेच चोरीचा मोटारपंप विकत घेणाऱ्या नागेश भगवान वाघ याच्याविरुद्धही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार आणि ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक विनायक जाधव, पोलीस उपनिरीक्षक सागर भारस्कर यांच्यासह पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# कोरडा दुष्काळ जाहीर करा; हेक्टरी ५० हजाराची मदत द्या

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

## गोर सेनेची मागणी

जिल्ह्यात शेतकऱ्याजवळ सिंचनासाठी मोठ साधन नसल्याने वाशिम जिल्हा हा पावसाळी पाण्यावर जास्त प्रमाणात अवलंबून असल्यामुळे आणि ज्या शेतकऱ्याकडे सिंचन व्यवस्था अपुरी असल्यामुळे ते सिंचन क्षेत्रे सुद्धा पावसा अभावी न भरल्यामुळे उभी पिके वाळली आहे. जिल्ह्यामध्ये हजारो हेक्टर वरील पिके पाण्या अभावी अक्षरशः वाळून गेली असुन वाशिम जिल्हा हा कुठलेही पंचनामे, कुठलाही सर्वे न करता तत्काळ सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करावा. आणि शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजाराची मदत तत्काळ जाहीर करावी. असे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले.

व निवेदानाच्याच्या प्रती मुख्यमंत्री, कृषिमंत्री, पालकमंत्री,




वाशिम जिल्याचे खासदार, आणि जिल्यातील सर्वच आमदारांना देण्यात आले आहे.निवेदन देता वेळेस निलेश राठोड-गोरसेना जिल्हा सचिव वाशिम, महादेव चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते संतोष चव्हाण, पंकाज्भाऊ जाधव, कैलास राठोड(शिरपुटीचे समाजकार्यकर्ते) आदीची उपस्थिती प्रामुख्याने होती. वाशिम जिल्हा तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर न केल्यास आणि शेतकऱ्याना हेक्टरी ५० हजाराची मदत न केल्यास शेतकऱ्यासाठी आंदोलनाचा इशारा या वेळी निलेश राठोड यांनी दिला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135